**विवरण**:--संतकृपा किंवा भगवत्कृपालेश, हें श्रद्धायुक्त भगवद्भक्ति प्राप्त होण्याचें मुख्य साधन आहे, असें ह्या सूत्रांत सांगून संतकृपेचें फल पुढील सूत्रांत कथन केलें आहे; आणि त्याच्या पुढील दोन सूत्रांत संतकृपा-प्राप्तीचें साधन सांगून तिचा लाभ मुमुक्षूंनीं अवश्य करून घ्यावा, असें शेवटीं बेचाळिसाव्या सूत्रांत आग्रहानें बजावून सांगितलें आहे. ह्यावरून परम वैराग्य-शील भगवान् नारदांसारख्या संन्यासनिष्ठ सत्पुरुषांचें परम दीनदयालुत्व दिसून येतें. सर्व संत निःसंशय "**सर्वभूतहितेरताः**" (भ. गी. ५-२५) असेच असतात. आत्मोद्धार होणें हेंच जीवाचें खरें हित होय, अशी त्यांची पुरी खात्री झालेली असते. योग्य जिवाच्या साह्यार्थ ते स्वतः होऊनच धांव घेतात. विचारपूर्वक श्रद्धायुक्त सद्गुरुशरणागतीची इच्छा मात्र तीव्र पाहिजे, म्हणजे ती अनायासानें सफल होते, हा आमचा स्वानुभव आहे. "**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः**" (भ. गी. ६--५) ह्या भगवदुक्तीप्रमाणें साधकाच्या आत्मोन्नतीचें सारें काम स्वतः त्यालाच करा-वयाचें असतें. फार झालें तर "**तुझें आहे तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी॥**" असें म्हणून गुरु मार्गदर्शक होतील. आणि आधिभौतिक सुखदुःखप्राप्ति केवळ प्रारब्धाधीन असल्यामुळें तिच्यांत गुरूला प्रायः काडी-इतकाही फरक करतां येत नसल्याकारणानें त्या कामीं गुरूचा बहुधा कांहीं एक उपयोग नसतो. हीं शास्त्ररहस्यें न समजल्यामुळें मोठमोठे बहुश्रुत लोक व्यर्थ आशेला गुंतून अखेरीस गोत्यांत आल्याचीं बरींच उदाहरणें आहेत. महा विद्वान् आणि बुद्धिमान् म्हणून गाजत असलेले अनेक बडे पदवीधर अशा रीतीनें फसलेले व फसत असलेले पाहिले, म्हणजे माया-मोहाची दुर्निवार्यता आणि सकल आधिभौतिक विद्या--कलादिकांची दरिद्रता स्पष्टपणें सिद्ध होते. त्रिविध नरकद्वाररूप काम--क्रोध--लोभांच्यापुढें ह्या विद्याकला कशा फिक्या पडतात, तें प्रत्यक्ष दिसलें तरी त्यांचा मोह सुटत नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु त्या भूषणावहही वाटत असतातच, ह्यापेक्षां मायेचें दुरत्ययत्व अधिक काय सांगावें? अशा भोळ्याभाबड्या, आशाळभूत, अविचारजन्य अंधश्रद्धेमुळेंच भोंदू लोकांचें प्रस्त माजतें. कारण ज्या मालाचा

बाजारांत खप असेल तो माल सहजच उत्पन्न होतो. हे सारे विचार मनांत आणून आम्हीं सकल लोकांना अशी प्रार्थना करितों कीं, बाबांनो, ज्या विषयाची पूर्ण माहिती नसेल त्याच्यांत **"बाबा वाक्यं प्रमाणम्"** अशा अंध श्रद्धेनें विनाकारण ढवळाढवळ करूं नका. इतकेंच नव्हे, पण त्याच्यावांचून तुमचें कार्य नडलें नसेल तर, त्याच्या नादीं मुळींच लागूं नका. अध्यात्माची दुकानदारी करणें हें परमेश्वराच्या दृष्टीनें महत्पाप आहे, हें विसरूं नका. जो पूर्ण वैराग्यशील नसेल तो अध्यात्मशास्त्रांत गुरुस्थानीं बसण्यास सर्वथा अपात्र आहे हें पक्कें ध्यानांत ठेवा. अध्यात्म हा देवघेवीच्या व्यापाराचा विषय नव्हे, हे तत्त्व मनांत प्रथमतः बिंबवून घ्या. परमेश्वराची प्राप्ति व्हावी अशी इच्छा खरोखर असेल तर कामनानाश करण्याचें जें तुम्हांला साध्य असलेलें तुमचें आद्य कर्तव्य आहे, तें स्वतः करून मोकळे व्हा. एवढें तुम्ही केलें म्हणजे तुम्हाला महत्कृपालाभ आपोआप होऊन तुमचा पुढील मार्ग सुकर होईल. स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ ह्यांच्या मार्गाचें विस्मरण होऊं देऊं नका. स्वामी विवेकानंदांना पूर्ण संन्यासाशिवाय श्री रामकृष्ण परमहंसासारख्या पुरुषोत्तमाचा महत्कृपालाभ होणें शक्यच नव्हतें. अध्यात्मशास्त्र हें ह्या सकल जगाची राखरांगोळी झाली ( भ. गी. १८--१७ ) तरी त्याची पर्वा न करणारें आहे, ( भ. गी. २--१६,२८ ), हें त्यांतील सद्रहस्य उमजून पूर्ण वैराग्य प्राप्त झालें नाहीं, तोंपर्यंत आधीं व्यवहारिक समता आणि दया हे गुण तरी पूर्णपणें प्राप्त करून घ्या; म्हणजे **"दया करी जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥"** अशा प्रकारची तुमची बुद्धि अगदीं शुद्ध होऊन तुम्हांला " **तेचि भगवंताची मूर्ति** " असें स्वतः तुकाराम महाराजच म्हणतील ! ह्यापेक्षां तुम्हांला अधिक पाहिजे काय ? अहंभावाची होळी झाल्याशिवाय अशी समबुद्धि प्राप्त होणें शक्यच नाहीं; आणि अहंभाव सर्वस्वीं जाणें ह्याचेंच नांव ज्ञान. जोंपर्यंत मृत्युपत्रें वगैरे करण्याची इच्छा आहे, तोंपर्यंत अहंभावजन्य असमतेची " **शिल्लक पेस्तर रोजाकारणें** " ( पुनर्जन्मासाठीं ) राहाणारच; आणि पुढल्या जन्मीं " **शिल्लक रोज गुदस्त** " अशी ती जमेच्या बाजूस दाखलही होणारच ! मग " **निर्ममो निर-**

**हंकारः । सशांतिमधिगच्छति** " ( भ. गी. २--७१ ) ह्याचा अनुभव कोण घेणार ? " **वेदान्त तो नव्हे लेंकुरांच्या गोष्टी ॥** " हें संतवचन खोटें नाहीं.

**सूत्र ३९ महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥**

**आर्या:**—सत्संग फार दुर्लभ, झाला तरि तो पचे न बहुतांना ।
भक्तातें तो पचल्या निजशांती देइ शेवटीं **सांइ** ॥

---

**विवरण:—" गोबरका कीडा गोबरमें राजी "** असाच प्रकार ह्या दुस्तर, गुणमय भवसागरांत सतत निमग्न राहाणाऱ्या सकल जीवांचा आहे. भक्तियोगाचा आश्रय केल्याशिवाय त्यांतून कधींच कोणाची सुटका होत नाहीं. ( भ. गी. ७--१४ ) परंतु मायेच्या म्हणजे अज्ञानजन्य मोहाच्या तावडींतून सुटून सिद्धावस्था प्राप्त करून घेण्याची इच्छा असलेले साधकच ह्या भूलोकांत क्वचित् असतात, मग सिद्धावस्था प्राप्त होऊन तद्वारां ज्ञानप्राप्ति झालेले जीवन्मुक्त पुरुषोत्तम बहुधा नाहींतच असें म्हणावें लागतें ( भ. गी. ७--३ ). हा विचार मनांत आणूनच महत्संग **दुर्लभ** आहे, असें ह्या सूत्रांत प्रथमतः सांगितलें आहे. जीवन्मुक्त-सुद्रुरुप्राप्तीलाच महत्संग अथवा सत्संग म्हणतात. कारण त्यांनाच **तत्सद्ब्रह्म** प्राप्त झालें असतें. इतर असन्मय अथवा सदसन्मय असलेल्या अज्ञानी जीवांच्या संगाला तत्त्वतः सत्संग म्हणतां येत नाहीं. विषयेंद्रियसंगलालसेंत दंग असलेल्या अनंगप्रिय जीवांना सत्पुरुषाची परीक्षा करितां येणें शक्यच नसल्यामुळें महत्संग **अगम्य** आहे, असें ह्या सूत्रांत पुढें सांगितलें आहे. " **न मिळो खावया न वाढो संतान । परी हा नारायण कृपा करो**" असेंच सकल सत्पुरुष सतत म्हणणार. तेव्हां अशा सर्व संन्यासी पुरुषांचें हृद्गत आणि त्या हृद्गताचें महत्तमत्व विषय-लोलुप असलेल्या ह्या जगाला कळावें कसें ? प्रायः प्रत्येक व्यवहारी जीव कांहीं तरी आधिभौतिक लाभास्तवच सत्संगेच्छू असतो. अशा जीवांना खरा सत्संग सहजच अगम्य असणार. अशा लोकांकडून सत्संगमहात्म्याचीं जीं वर्णनें होतात,

त्यांच्यामुळें बहुधा सत्संगविटंबना मात्र होते, असें तात्त्विकदृष्ट्या म्हणणें भाग आहे. हेंच महत्संगाचें **अगम्यत्त्व** होय. महत्संग **अमोघ** आहे, असें जें ह्या सूत्रांत शेवटीं म्हटलें आहे, त्याचें कारण असें आहे कीं, साधकावस्थेंतील आपलें स्वतःचें असलेलें कर्तव्य संपवून नंतर श्रद्धायुक्त अंतःकरणानें ज्ञानप्राप्त्यर्थ वैराग्यमूलक शरणागति करणाराची इच्छा सद्गुरुकडून सर्वस्वी सफळ होते; कारण **"आपणांसारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥"** असा त्यांचा सहज-गुण आहे. अपात्रीं दान मात्र ते कधींच करीत नाहींत.

**सूत्र ४०** **लभ्यतेऽपि तत्कृपयैव ॥**

**आर्याः**—सत्संगाचा लाभहि, ईशकृपेनेंच होइ सिद्धांना ॥
पूर्वार्जित पुण्यें मज, ईशकृपारूप लाभ **साईचा** ॥

**विवरणः**— सत्संगाचा लाभही फक्त ईशकृपेनेंच होतो, इतकाच ह्या सूत्राचा अर्थ आहे. अनंत जन्मींचीं सत्कर्में ( भ. गी. १७--२३ते २७) फलोन्मुख झालीं, म्हणजे बुद्धि **व्यवसायात्मिका** ( केवल ईशपर ) होते, अशा अर्थाचा जो अनुस्मृत्यंतर्गत श्लोक प्रथम सूत्राच्या विवरणांत उद्धृत केला आहे, त्यांत सांगितल्याप्रमाणें बुद्धि उत्पन्न होणें, हीच सत्संगदात्री ईशकृपा होय. तथापि सत्संग-लाभ होण्यास आणखाही दुसरें एक अति दुर्लभ बुद्धि-सामर्थ्य लागतें, तें पुढील सूत्रांत सांगितलें आहे.

**सूत्र ४१** **तस्मिन्स्तज्जने भेदाभावात् ॥**

**आर्याः**—संत स्वयेंचि भगवान्, ऐशी हृदयीं असेल जरी श्रद्धा ।
सत्संग तरिच लाभे, अभिमानत्याग **साईला** लागे ॥

**विवरणः**--**" नर करणी करे तो नरका नारायण होय "** (भ. गी. ५-१९) अशी ज्ञानप्राप्तीच्या फलाविषयीं दृढ श्रद्धा होऊन, स्वकरणीनें

नराचे नारायण झालेले विरळा पुरुष जगांत असतात. (भ. गी. ७-३), अशी दृढभावना झाली, म्हणजे मग मन सहजच संतदर्शनाविषयीं आतुर होतें; आणि तसें झालें म्हणजे संतरूपानें श्रीहरि-दर्शन होतें (४-११, ३४;७-१८) असा नम्र लेखकाचा स्वानुभव आहे. इ. स. १८९९ सालीं मुद्दाम रजा घेऊन एलिचपूर येथील ब्रह्मीभूत श्रीशंकर भटजी, पलूस येथील ब्रह्मीभूत श्री. धोंडीबाबा, हुबळी येथील श्री सिद्धारूढ स्वामी, ह्या तीन संतांची दर्शनें घेतलीं, व पुढेंही पलूस आणि हुबळी येथें दोन तीन वेळां पुनः गेलों होतों; तेव्हां पूर्वी वाचनांत आलेल्या संतलक्षणाचा प्रत्यक्षानुभव येऊन श्रद्धा दृढ झाली. परमपूज्य ब्रह्मीभूत मित्र विनायकराव रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन ह्यांचा सत्संग तर सतत सुमारें तीस वर्षांवर लाभला होता. आणि शेवटीं ब्रह्मात्मैक्याविषयीं बुद्धीची खात्री होऊन प्रपंचपाशांतून सुटका होण्याची वेळ प्रारब्धानुसार समीप आली, तेव्हां इ. स. १९१० सालीं डिसेंबर महिन्यांत आमची इच्छा नसतांही श्रीसांईनाथप्रेरित कै. वा. श्रीयुत हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित वगैरे मित्रांनीं निवळ जुलमानें आमची मोट बांधून आम्हांला शिरडीस रवाना केलें. तेथेंही प्रथमतः सुमारें महिना दीड महिना आमची तेथील विद्वान मित्रमंडळीबरोबर आणि स्वतः श्री सांईनाथांशींही सारखी लढाई सुरू होतीच. कारण "**हुरळली मेंढी आणि लागली लांडग्याच्या पाठीस,**" अशी आपली दशा करून घ्यावयाची नाहीं, असा निश्चय होता. नंतर सुमारें दीड महिन्याच्या कालांतील नित्य सहवासामुळें तेथें श्री बाबांच्या तपोमूलक अतर्क्य अतींद्रिय ज्ञानाचे अगणित अनुभव येऊन शिवाय त्यांच्या अचल, तीव्र वैराग्याचा जेव्हां प्रत्यक्ष अनुभव आला, तेव्हां सकल संशयाची निवृत्ति होऊन अहंभावमूलक दुराग्रहबुद्धि नसल्याकारणानें खऱ्या गुरुशरणागतीचा योग सहजच जुळून आला, आणि मनाची पूर्वीची तळमळ नष्ट झाली. हा योग जुळून आणण्यास मुख्यतः कारणीभूत झालेल्या सात्विक, प्रेमळ मित्राच्या अनंत चिरस्मरणीय उपकारांची फेड शब्दांनीं होणें

शक्य नाहीं, असें व्यवहारदृष्ट्या कबूल करणें भाग आहे. आणि दयाघन गुरुमाउलीचे उपकार फेडण्याची कल्पना मनांत येणें, म्हणजे त्या अखंड सर्वहृदयस्थ असलेल्या ( भ. गी. १३-२ ) मंगलमूर्तीपासून आपल्याला विभक्त करण्याचें आत्महत्त्यारूपी महत्पाप बुद्धिपूर्वक करणें होय. ह्यास्तव तें सर्वथा अकार्य आहे. तात्पर्य, सत्पुरुषाच्या ठिकाणीं परमेशबुद्धि अचल झाली, म्हणजे मोक्षदायक सत्संगप्राप्ति अनायासेंच होते.

ह्या प्राप्तीच्या आड येणारा मनुष्याचा अधिघातक वैरी त्याचा अहंभावच होय. आणि " **नवल अहंकाराची गोठी ॥ विशेषें नलगे अज्ञानापाठी ॥ सज्ञानाचे झोंबे कंठीं ॥ नाना संकटीं नाचवी ॥** " ह्या संतोक्तीप्रमाणें तो दुष्ट मिथ्या ज्ञानालंकारविभूषितांच्या सतत पाठीस लागलेला असल्यामुळें आधिभौतिक वैभववैपुल्याशिवाय इतरत्र शरणागत होण्यांत त्याला कमीपणा वाटतो. ह्या अहंभावामुळेंच त्यांच्यापैकीं अनेकांकडून " **जित्यां न मिळे अन्न । मेल्यां करी पिंडदान** ॥ " असा प्रकार होत असलेला पाहिला म्हणजे श्रीतुकाराम सारखे संत प्रस्तुत ह्यात नाहींत, हें त्यांचें महद्भाग्यच समजलें पाहिजे, असें वाटतें. ह्या अहंभावामुळेंच जगांत सर्वत्र अनीतीचें साम्राज्य चालत असून आपल्याला अति शहाणे समजणाऱ्या अत्यंत सुशिक्षितांचेंही आचरण प्रायः " **बळी तो कान पिळी** " ह्याच न्यायाचें सदासर्वदा, सर्वत्र दृष्टोत्पत्तीस येत असतें. जगांतील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचें तर " **बळी तो कान पिळी** " म्हणजे "Survival of the fitted" हें महावाक्यच होऊन बसलें आहे. अशा तऱ्हेनें विचार केला म्हणजे " **नादे चित्ता शांति ऐशी विद्या काय़ाला** " हें प्रल्हादाख्यानांतील वाक्य आठवून जगांतील सर्व विद्येला रामराम ठोकणेंच उत्तम, असें म्हणणें प्राप्त होतें. परंतु " **चोराच्या उलट्या बोंबा** " ह्या म्हणीप्रमाणें असले अहंभावपूर्ण लोक अहंभावशून्य वेदान्तानें आमच्या देशाचें वाटोळें केलें अशी सतत ओरड करीत असतात ! " **निर्ममोनिरहंकार** " ( भ. गी. २-७२ )

झालेला पुरुष दुसऱ्याचें नुकसान करितो,' हें म्हणणें पाण्यानें आग लागते, असें म्हणण्याइतकेंच शहाणपणाचें आहे ! पण जगाच्या तोंडाला हात कोण लावणार ?

**सूत्र ४२ तदेव साध्यताम् तदेव साध्यताम् ॥**

**आर्या:--** सत्संगाचा ऐसा महिमा संपूर्ण नीट जाणावा ।
बहुत अवश्य असे तो, **सांई**कृपेवीण मोक्ष नच लाभे ॥

---

**विवरण:—**मागील सूत्रांत "**गुरुःसाक्षात्परब्रह्म**" अशी बुद्धि असेल तरच सद्गुरुप्राप्ति होऊन ती मोक्षदायक होते असें सांगितलें असून अशा बुद्धीनें केलेल्या गुरुभक्तीहून ईशभक्ति भिन्न नाहीं, असा सिद्धांतही त्यायोगें सहजच प्रस्थापित होतो. ह्यास्तव मुमुक्षूनें सद्गुरुप्राप्ति करून घेण्याच्या मार्गास अवश्य लागावें, असा ह्या सूत्रांत आग्रहपूर्वक बोध केला आहे.

परंतु आमच्या इतर सकळ आर्य संस्कृतीबरोबर अध्यात्मविद्येचाही लोप झाल्यानें "**तेल गेलें, तूप गेलें धुपाटणें हातीं आलें**" असा प्रसंग धूर्त यवन परकीयांनीं आमच्यावर जो आणिला आहे, त्याचें आद्य कारण आमच्याच श्रेष्ठांची ( प्रजापालकांची ) स्वधर्मभ्रष्टता होय. त्यांच्या स्वधर्मभ्रष्टतेमुळें त्यांच्यांतील शौर्य, तेज, धृति, दान, ईश्वरभाव ( भ. गी. ८--४३ ) इत्यादि गुण सहजच नष्ट होऊन प्रजाही धर्मभ्रष्ट झाल्या. सर्व पृथ्वीभर सुवर्णभूमि म्हणून स्वत: आमच्याच लहानपणीं जो आमचा हिंदुस्थान देश सुप्रसिद्ध होता, तो आतां कोटयानुकोटि रुपयांच्या कर्जांत खितपत पडला आहे. मणावर धारण असे, ते दिवस गल्यावरही इ. स. १८८५--८६ सालीं माळवा प्रांतांत एक रुपयाला चाळीस शेर कणीक आम्हीं आपल्या हातानें घेतली होती, ती आतां रुपयाची पुरती चार शेर सुद्धां पदरीं पडत नाहीं. पुणें शहरांत

हिंवाळ्या-पावसाळ्यांत कांदे, वांगीं, बटाटे, गाजरें, ह्या भाज्या आम्हीं लहानपणीं शनवारवाड्याच्या पुढील मंडईंत एक पैशाला पक्के दोन-चार शेराच्या भावानें घेत होतों, त्या आतां एक रुपयाला सुद्धां कधीं कधीं चार शेर मिळत नाहींत. इ. स. १९०३।१९०४ सालीं पुण्यापासून चार पांच कोसाच्या आंत खडकवासल्यास उत्तमोत्तम खवा एक रुपयाला पक्के चारशेर ( आठ रत्तल ) अनेकदां घेतलेला आहे, पण तितक्याच खव्याला आतां पांच सहा रुपये द्यावे लागत असून तेंव्हांच्या खव्याच्या भावानें दूध सुद्धां आतां मिळत नाहीं. उत्तम लोणीं लहानपणीं पुण्यांतच एक रुपयाला दोन शेरपासून पावणेतीन शेरांपर्यंत घेतलेलें आहे; आणि आतां तेंच एक रुपयाला अर्धा शेरसुद्धां मिळत नाहीं. पूर्वीं सर्व देशभर प्रांतोप्रांतीं हजारों खंडी धान्यांचीं पेवें आमच्या आठवणींतच होतीं; पण आतां शेतकरी लोकांपाशीं नुसत्या पेरणीपुरतें सुद्धां धान्य शिल्लक नसतें. सुमारें पंचवीस वर्षांमागें महाबळेश्वरास जी लाकडाची मोळी चार सहा पैशाला मिळत असे, तिला तेथेंच आतां बारा आणे द्यावे लागतात. तेथें एक रुपयाला मधाच्या पांच सहा बाटल्या घेत होतों, पण तेथून आम्हीं नुकत्याच मधाच्या तीन बाटल्या आणविल्या त्यांची किंमत साडेचार रुपये पडली.

अशा निकृष्टावस्थेंत आपल्या ब्रह्मविद्येची पूर्ण विस्मृति होणें, हें अगदीं सहाजिकच आहे. तथापि "**सुंभ जळतो, पण पीळ जळत नाहीं**" ह्या म्हणीप्रमाणें आमचा दिमाख मात्र वाढत आहे. एकंदरींत आमचें राष्ट्रीय प्रारब्ध फार खडतर आहे, हेंच खरें; कारण ज्या आमच्या ब्रह्मर्षि, महर्षि, राजर्षि महात्म्यांनीं खऱ्या देवाचा पत्ता लावला, त्यांचेच अहंमन्य वंशज जर त्या देवाच्या तंगड्या त्याच्याच गळ्यांत घालण्याच्या खटपटींत धन्यता मानूं लागले, तर त्यांना अधःपाताशिवाय इतर काय मिळणार ? आपल्या खऱ्या देवाला विसरूं लागल्यापासून आज सुमारें निदान दोन हजार वर्षें आमच्या पूर्वींच्या वैदिक दैवी संपत्तीला सारखी

ओहोटीच लागली आहे ! खऱ्या देवाच्या विटंबनेचें फळ असेंच (भ. गी. ४–११) मिळावयाचें ! !

**त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषणाम् ।**
**यशसे विजिगीषूणां प्रजायै गृहमेधिनाम् ॥**

( अर्थ-आर्या-स्वकृत )

द्रव्याचा संचय तो, दानार्थ क्षत्रियांसि योग्य असे ।
मित भाषण सत्यार्थी, सुकीर्तिसाठींच विजय इच्छावा ॥ १ ॥
संतति-रक्षण करणें, विवाह हेतू नसे दुजा बरवा ॥
रघुकुल भूषित केलें, राजर्षींनीं अशाचि व्यवहारें ॥ २ ॥

अशा प्रकारचा लौकिक व्यवहार करून, आणि त्याचप्रमाणें

**शैशवेभ्यस्त विद्यानां यौवने विषयैषिणाम् ।**
**वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥**

(अर्थ-आर्या-स्वकृत )

विद्यार्जन अल्पवयीं, तारुण्यीं विषय-वासना- तृप्तीं ।
मुनिवृत्ती वृद्धपणीं, ईशस्मरणेंचि देह सोडावा ॥

ह्या प्रकारें आत्मोद्धार करून घेणारे आमचे श्रेष्ठ ( नराधिप ) जेव्हां नाहींसे झाले, तेव्हांपासून सुरू झालेली आमची अवनति दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत आहे, तरी अद्याप आमचे डोळे उघडत नाहींत ! !

**सूत्र ४३ दुःसंगः सर्वथैव त्यज्यः ॥**

**आर्या:—** द्वैती नास्तिक विषयी, अथवा अश्रद्धान असती जे ।
त्यांशीं संगत्यागें, उदास वृत्तीच साधकें धरिजे ॥

**विवरण:—**दु:संग कशाला म्हणतात, तें ह्या आर्येंत सांगितलें असून तो साधकांनीं त्याज्य कां समजावा, त्याविषयीं चौदाव्या सूत्राच्या विवरणांत पूर्ण विचार केलेला आहे.

ह्या सूत्रांतील "**त्याज्य**" हा शब्द नवव्या आणि अकराव्या सूत्रांतील "**उदासीनता**" ह्या शब्दाच्या अर्थाशीं विरोधी नाहीं, एवढें मात्र प्रत्येक साधकानें पक्कें लक्षांत ठेवावें. साधकानें दु:संगाचाही द्वेष करू नये, कारण द्वेषबुद्धि अशुभच आहे; तथापि दु:संगाविषयीं साधकानें नित्य तटस्थ मात्र अवश्य असावें, नाहीं तर तो त्यांच्या पाशांत सांपडून पतन पावेल. बाकी साधक दशा संपून सिद्ध झालेल्या भाग्यशाली पुरुषापुढें दु:संगाचें कांहींच बल चालत नाहीं; आणि श्री तुकारामासारिखे जीवेशैक्यपदास पावलेले पुरुष तर आपल्या ऐश्वरी साम्यबुद्धीनें ( भ. गी. ४—११ ) अगदीं स्पष्टपणें असें सांगतात कीं:—

" मऊ मेणाहुनी आम्हीं विष्णुदास, कठिण वज्रास भेदूं ऐसे ।
भले तरी देऊं गांडीची लंगोटी, नाठाळाचे काठी देऊं माथां । "

अनंत पूर्वजन्मीं केलेली सकल सत्कर्में ( भ. गी. ३-९; २७-२३ ते २७ ) सफल होऊन ज्या पुण्य पुरुषांना जन्मतःच **शम, दम, तप, शौच, क्षांति, आर्जव, ज्ञान, विज्ञान,** आणि **आस्तिक्य** ह्या नव रत्नांचा लाभ होतो ( भ. गी. ६-३;१८-४२ ) त्यांच्या स्वभावज कर्मानेंच संन्यासाश्रमधर्मास त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे, असें सिद्ध होतें. ज्यांचीं स्वभावज कर्में अशीं श्रेष्ठ असतात ते ब्राह्मण, आणि त्यांचा संन्यासाश्रम, हे सर्व वर्णाश्रमांत श्रेष्ठ आहेत असें भगवान श्रीकृष्णाचें मत गीता अध्याय १८ श्लोक ४१ ते ४४ ह्यांतील क्रमावरूनच निःसंशय सिद्ध होत असून तें अनुगीतेशीही अगदीं तंतोतंत जुळतें. इतकें ध्यानांत ठेविलें म्हणजे "**विविक्त देशसेवित्वं अरतिर्जनसंसदि**" ( भ. गी. १३-१० ) ह्या ज्ञान चिन्हद्वयानें अंकित असलेल्या साधकांना त्यांच्या तारुण्यांतील सतत आरण्यवासास्तव श्री समर्थांनीं **धन्य** कां म्हटलें आहे, त्याचें मर्म कळून येतें. परंतु गीतेच्या सत्यार्थाचें प्रतिपादन करण्यास आणि तें उमजण्यास जी श्रद्धाजन्य सद्बुद्धि ( भ. गी. ४-३९ ) लागते, **तुका म्हणे**

**ग्रंथें पाहिजे जातीचे। येर गबाळाचें काम नोहे ॥** तीच जेथें नाहीं, तेथें "**कलौ वेदान्तिनो भांति फाल्गुने बालका इव ॥**" असाच प्रकार होणार !

पंचविसाव्या सूत्राच्या विवरणांतील श्री तुकारामाचे बडगे आमच्या आधुनिक वीरांना असह्य होऊन त्यांना जसा त्या महात्म्याच्या उक्तींचा भाग त्यागलक्षणेनेंच उपयोग करावा लागतो, तशाच प्रकारची तारांबळ आमच्या कांहीं राजकारणवादी पंडितंमन्यांची श्री समर्थांविषयीं होत असते. समाजांत राहूनच जो परमार्थ साधन करील, तो पुरुष धीरोदात्त होय. अशा बाष्कळ, अप्रयोजक, विचारशून्य स्वमताच्या समर्थनार्थ ते समर्थांचा आश्रय करीत असतात; आणि त्याच श्रीसमर्थ रामदास स्वामींनीं आपलें सबंध तारुण्य तपाचरणार्थ प्रायः अरण्यांतच घालविलें, ही गोष्ट मात्र गुलदस्तांत ठेवितात.

सर्व संतांचा परमार्थमार्ग वस्तुतः संन्यासात्मक असून तो फक्त वैराग्यशील पुरुषांकरितांच आहे. ( भ. गी. २-४५; ३-४१ ), हें तत्त्व कोणाच्च समजेनासें होऊन आमचा सारा समाज भांबावून गेला आहे. दारूच्या गुत्त्यांत सतत राहून दारूपासून सर्वस्वी अलिप्त राहाणें किंवा वेश्यागृहांत सतत वास करून ब्रह्मचर्याचें परिपालन करणें ह्या गोष्टी तारुण्यांत सिद्धावस्थेपूर्वी जितक्या दुष्प्राप्य आहेत, तितकेंच सिद्धावस्थेपूर्वी समाजांत राहून साधकास अत्यावश्यक असलेल्या सत्यव्रतादिकांचें परिपालन करणें अशक्य आहे ( भ. गी. २-६९ ). हा साधनमार्ग अतिशय कठीण आहे, म्हणूनच खरे साधक अति दुर्मिळ असतात. ( भ. गी. ७-३ ). त्यांच्या व्यावहारिक कर्माभावानें जगाचें यत्किंचितही अनहित होणें शक्य नसून उलट त्यांच्या शुद्ध सात्त्विक आचरणानें जगांत ज्ञानमार्गाची परंपरा अव्याहत सुरू राहून जगाला नरदेहाच्या अंतिम साध्यास मुकण्याची पाळी न आल्यामुळें जगाचा अतिशय मोठा फायदाच होतो. हें तत्त्व जाणून परम कारुणिक श्री नारदांनीं ह्या सूत्रांत शुद्ध अद्वैत भक्तिमार्गास जीं कर्में अथवा जे पुरुष अननुकूल अस-

तील त्या सर्वांना सिद्ध पुरुष त्याज्य समजतात व साधकांनीं त्याज्य समजावें असा प्रेमपूर्वक उपदेश केला आहे.

एखादा भूलोकावरील चक्रवर्ति जर शतक्रतु झाला, तर तो आप ल्याला स्थानभ्रष्ट करील, अशा भीतीनें त्याच्या यज्ञांत जशीं इंद्राकडून विघ्नं उपस्थित होत असत, तद्वत् आमचे व्यवहारपटु पंडित आपण स्थानभ्रष्ट होऊं ह्या भीतीनें साधनमार्गांतील संन्यासाची नेहमीं निर्भर्त्सना करण्यास टपलेले असतात; परंतु ईश्वरेच्छेनें एखाद्या रामेश्वर भट्टावर देखील अखेरीस श्री तुकारामासारख्या दृढ वैराग्यनिष्ठ पुरुषाचे पाय धरण्याची पाळी येतेच. दृढ वैराग्योद्भूत शांतीचा आनंद वाचेनें कसा बोलावा? श्री. अण्णासाहेब पटवर्धनांनीं एकदां आमच्यापाशीं काढिलेल्या "**आतां महाराजांच्या कृपेनें आम्हांला पुनः येथें येण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं**" ह्या उक्तींतील जीवन्मुक्तीच्या आनंदाचें वर्णन कसें करावें! ह्या आनंद घेण्याचा अधिकार फक्त संन्यासमार्गी संतांचाच आहे!

**सूत्र ४४** **कामक्रोधमोहस्मृतिभ्रंशबुद्धिनाशसर्वनाशकारणत्वात् ॥**

**आर्या** कामक्रोधा मोहा, स्मृतिच्या भ्रंशास बुद्धिनाशाला ॥
अखिल विनाशा कारण, ह्यास्तव हेयचि म्हणे तया **सांई** ॥

**विवरणः**—मागील सूत्रांत सांगितलेला **दुःसंगत्याग** आणि पसतिसाव्या सूत्रांत सांगितलेले **विषयत्याग** व **संगत्याग** ह्या सर्वांची तत्वतः एकात्मता आहे. मनःसंकल्पोद्भूत **काम** (भ.गी.६-२४) आणि विषयचिंतनमूलक संगोद्भूत **काम** ( भ. गी. २-६२ व ६३ ) हे दोन्ही सर्वथा अभिन्न आहेत. ह्या त्यागत्रयांतील विषयसंगत्यागाचा अर्थ सर्वकर्मसंन्यास असा आहे ( भ. गी. १८-६६ ); कारण अखिल विश्वाचा मुख्य यजमान जो प्रभु अच्युत त्यालाच ज्यानें गांठला. त्याला त्या अच्युताच्या आचार( कर्म )रूपी धर्म नामक मंत्र्याची गांठ घेण्याचें कांहीं एक प्रयोजन नाहीं. सर्वकर्मसंन्यास-

रूपी विषयत्यागाचा पूर्ण विचार मागील पसतिसाव्या सूत्राच्या विवरणांत केलेला आहे, ह्यास्तव त्याची येथें पुनरुक्ति करीत नाहीं.

परंतु रजोगुणसमुद्भव रिपुश्रेष्ठकामाची ( भ. गी. ३-३७ ) ह्या सूत्रांत भगवद्गीतेप्रमाणें ( भ. गी. २-६२ व ६३ ) जी संतति सांगितली आहे, तिचा थोडासा विचार केला पाहिजे. काम म्हणजे इच्छा होय. ह्या इच्छेच्या साफल्यास जें कांहीं विघातक असेल त्याच्याविषयीं मनांत क्रोध उत्पन्न होतो. क्रोधानें विवेक नष्ट होतो. ह्या विवेकभ्रष्टतेलाच संमोह म्हणतात. संमोहामुळें आपण कोण आहों, कोठें आहों, काय करीत आहों वगैरे मागची पुढची आठवण नाहींशी होते. ह्याचेंच नांव स्मृतिभ्रंश. आठवण नाहींशी झाली कीं विचारशक्ति जाते. ह्याचेंच नांव बुद्धिनाश. आणि बुद्धिनाश झाला म्हणजे मनुष्यत्वाची हानि होऊन मनुष्य पशुवत् बनतो. हाच मनुष्याचा प्रणाश म्हणजे सर्वनाश होय. ह्याकरितां ज्याप्रमाणें वृक्षाचें मूळ खणून टाकलें म्हणजे त्याचा सकल विस्तार आपोआप मरून जातो, त्याप्रमाणें ह्या अनर्थ-परंपरेचें कामरूप मूळ उपटून टाकलें म्हणजे ती सर्व परंपरा सहज नष्ट होते.

## सूत्र ४५ तरंगायिता अपीमे संगात्समुद्रायंति ॥

**आर्या** तुच्छचि लहरी भासे, रिपुसंघाची जरीं प्रथम लोकां ।
तरि पुढती सागरसम, अगाध होतेच ती कथी **सांई** ॥

**विवरणः**--साधकाला कुपथ्यकर असलेल्या विषयचिंतनादि दुःसंगाचा अवश्य त्याग करावयाचा उपदेश सूत्रें त्रेचाळीस ह्यांत केला आहे. सुसंग कोणता आणि दुःसंग कोणता, ह्याची खरी निवड करण्याचें काम फारच कठीण आहे, म्हणून प्रथमतः पसतिसाव्या सूत्रांत सर्वसंगपरित्याग करण्याचा उपदेश केला; आणि तो जर असाध्य असेल, तर निदान दुःसंगाचा त्याग तरी अवश्य केला पाहिजे, असें ह्या मागील तीन सूत्रांत सांगितलें आहे. साधकाला त्याच्या पूर्वपुण्यानें सत्संग झाला तर उत्तमच आहे. सिद्ध-संग झाला तरी चांगला. परंतु साधकेतराशीं जर संग झाला तर तो दुःसंगच होय. आणि ह्या भूलोकीं साधक

सुद्धां अति दुर्मिळ असतात. ( भ. गी. ७-३ ) असें प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण सांगत आहेत, त्यावरून व्यवहारामध्यें दुःसंग प्रायः अनिवार्य आहे असें सिद्ध होतें; ह्यास्तव साधकानें सर्वसंगपरित्याग करून अरण्यवास करणें श्रेयस्कर होय.

"**गारगोटीच्या पोटीं हिरा**" ही म्हण सुप्रसिद्ध आहे. परंतु लाखों गारगोटयांमध्यें एखादीच्याच पोटीं हिरा असतो; आणि साऱ्याच गारगोटया बाहेरून दिसण्यांत प्रायः सारख्या असल्यामुळें कोणत्या गारगोटीच्या पोटीं हिरा आहे, हें निश्चितपणें जाणण्यास जसा उत्तम रत्नपारखी लागतो, त्याचप्रमाणें असंख्य दंभपूर्ण लोकांमध्यें खरा सत्वशील कोण आहे, तें हुडकून काढण्यास अति सूक्ष्म दृष्टीचा, सुविचारी, शांतचित्त, श्रद्धावान् पुरुष लागतो. हें काम घाईनें होत नाहीं. घाई करतात ते बहुधा फसतात. त्याचप्रमाणें आध्यात्म-शास्त्ररहस्य न जाणणारे अनेक गृहस्थही लोकादरास पात्र झालेल्या दांभिकांच्या जाळ्यांत सांपडून फशीं पडतात. तपोबलानें त्रिकालज्ञता प्राप्त होऊन तद्द्वारां कांहीं भूतभविष्यकालीन गोष्टी संतांच्या मुखांतून सहज बाहेर पडतात; आणि अशा चमत्कारामुळें कांहीं वैराग्यविहीन लोक केवळ आधिभौतिक फलप्राप्तीच्या इच्छेनें त्यांच्या भजनीं लागतात, ही एक प्रकारची स्वतःची फसणूकच आहे. कारण अपरिहार्य प्रारब्धनिर्मित लाभालाभ, सुखदुःखें हीं संतांना तरी कशीं बदलतां येईल ? त्याचप्रमाणें सकल आधिभौतिक विद्या जिच्या पासंगालाही पुरणार नाहीं अशी अनुभवजन्य असलेली शब्दातीत अध्यात्मविद्या ( भ. गी. १०-३२ ) संतांना पूर्णपणें अवगत असल्यामुळें त्यांना सर्वज्ञ म्हणणें अयोग्य होणार नाहीं; परंतु तेवढयावरून त्यांना जगांतील सकल मिथ्यात्मभूत भाषाशास्त्रादिकांचें ज्ञान आहे, असें म्हणणें अगदीं अप्रयोजकपणाचें होईल; आणि अशा मिथ्या शास्त्रज्ञानाच्या अभावामुळें त्यांच्या सर्वज्ञतेला बाध येतो, असें म्हणणेंहीं मूढपणाचेंच ठरेल. वेदप्रतिपादित ( भ. गी. १५-१५ ) क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञानपूर्वक जीवब्रह्मैक्यता ( भ. गी. १३-२ ) अनुभवास येणें, ह्याचेंच नांव सर्वज्ञता आहे, हें शास्त्र-

रहस्य न समजून तद्विरुद्ध कुतर्क करणारे सकल जन अज्ञानग्रस्तच होत. तात्पर्य, साधकाच्या दृष्टीनें ह्या अधोगामी ज्ञाननाशक जगाचा संग हाच दुःसंग होय, आणि त्या संगाचा त्यानें अवश्य त्याग केला पाहिजे; कारण सकृद्दर्शनीं तो जरी विशेष हानिकारक भासला नाहीं, तरी अखेरीस तो सर्व नाशास कारण खास होणार, असा प्रस्तुत सूत्राचा अर्थ आहे.

एकोणचाळिसाव्या सूत्रांत सत्संग ( गुरुप्राप्ति ) **दुर्लभ** आहे असें सांगून त्याचा लाभ झाला तरी तो अगम्य आहे, असे जें म्हटलें आहे, त्याचें कारण बत्तिसाव्या सूत्राच्या विवरणांत उद्धृत केलेल्या चौसष्ट ओंव्यांवरून सहज लक्षांत येईल. मग ज्याला तो मुळीं झालाच नाहीं, त्याच्या शब्दज्ञानाची भाषाकोशापेक्षां अधिक किंमत काय असणार ?

आतां ह्या पुढील पांच सूत्रांत सकल हेयोपादेय साधनांचा उपसंहार करून त्यांचें फलमहात्म्यही सांगितलें आहे.

## सूत्र ४६ कस्तरति कस्तरति मायाम् ? यःसंगास्त्यजति, यो महानुभावं सेवते, निर्ममो भवति ॥

**आर्या** **सांई**मायानाशन, व्हावें ऐसें जया मनीं वाटे ।
त्यातें संग ममत्वहि, त्याज्य असे आणि इष्ट सत्सेवा ॥

**विवरण**:-मायामोहांतून कोण पार पडतो ? असा प्रश्न या सूत्रांत प्रथमतः केला असून नंतर **संगत्याग, संतदास्य,** आणि **निर्ममत्व** ह्या साधनांनीं साधकाची ह्या दुस्तर भवसागरांतून मुक्तता होते, असें उत्तर दिलें आहे. ह्या उत्तरांतील **संगत्यागाचा** विचार सूत्रें पसतीस आणि अडतीस ते पंचेचाळीस ह्यांत केला असून **संतदास्याचा** विचारही त्यांपैकीं सूत्रें अडतीस ते बेचाळीस ह्यांत झाला आहे. तिसरें साधन जें **निर्ममत्व** त्याचा विचार द्वितीय सूत्राच्या विवरणांत दिलेल्या लोकसंग्रहनिरिच्छके अनुगीतोक्तींत थोडाच झालेला असल्यामुळें, त्याचें येथें आणखी विवेचन करूं. दुसऱ्या सूत्रां-

तील **भक्ति** ह्या शब्दाच्या व्याख्येंत सर्वांतर्यामी असलेल्या ( भ. गी. १३-२ ) स्वहृदयस्थ श्रीहरीवर जें निस्सीम प्रेम, तीच खरी भक्ति होय, असें म्हटलें आहे. अर्थात् " **सर्वं खल्विदं ब्रह्म** " ह्या अद्वैत सिद्धांता-प्रमाणें सर्वांतर्यामी असलेल्या त्या अनंत सच्चिदानंदमय परमात्म्याला " **मम** " म्हणजे " **माझें** " असें म्हणण्याला तद्भिन्न सद्वस्तु नसल्यामुळें त्या सर्वव्यापकाच्या दृष्टीनें " **मम** " हा द्वैतात्मक शब्दच मिथ्या ठरतो. शिवाय मी म्हणजे " **अहं** " ही भावना उद्भूत झाल्याशिवाय माझें म्हणजे " **मम** " ही भावना उत्पन्न होणें शक्य नाहीं; आणि त्याचप्रमाणें अहं ही भावना उत्पन्न झाल्याशिवाय तूं म्हणजे " **त्व** " इत्यादि द्वैतात्मक भावनांची उत्पत्ति होणें असंभवनीय आहे. परंतु हे द्वैतात्मक शब्द तर प्रत्यक्ष व्यवहारांत आहेत, ह्यास्तव त्यांची उत्पत्ति कशी झाली, त्याचा विचार केला पाहिजे. " **त्याच्या आत्म्याला शांति मिळो** " अशी मृत देहाबद्दल शुभेच्छा प्रकट करण्याचा जो प्रस्तुत कालच्या सुशिक्षितांचा सार्वत्रिक प्रचार आहे, तो अज्ञानमूलक असून त्यावरून ( १ ) आत्मे भिन्न आहेत, ( २ ) ते नित्या-नंदमय नाहींत, ( ३ ) ते नित्यानंदमय परमात्म्याहून भिन्न आहेत, ( ४ जग सत्य आहे,अशा नाना अवैदिक कल्पना आमच्या पाश्चात्य उच्छिष्टभक्षण-) प्रियतेमुळें उद्भूत झालेल्या दिसतात. ह्या साऱ्या कल्पना चिज्जडग्रंथिमूलक म्हणजे देहात्मवादनिर्मित आहेत. तथापि वरील शुभेच्छा प्रकटीकरणावरूनच देहात्मभिन्नताही व्यक्त होते, आणि परमात्म्याच्या सर्वव्यापित्वावरून आत्म्यांची भिन्नता ही केवळ काल्पनिक ठरते. त्याचप्रमाणें सुखदुःखाभास हा मनाचाच धर्म असून आत्मा शुद्ध आनंदमय आहे, असें प्रत्येकाच्या गाढ-निद्रानंदानु-भवावरून सिद्ध होतें. तसेंच, " **आधारः सर्वभूतानां प्रसीदतु सनो हरिः** " हें वाक्य आत्मैक्यता व जीवेशैक्यतादर्शक असून त्यावरूनच सर्व पंचभूतात्मक वस्तु निराधार म्हणजे मिथ्या-काल्पनिक आहेत, असें होतें. ह्या साऱ्या उच्छिष्टदूषित खिचडीचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर " **ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव ना परः** " हें वेदान्तशास्त्ररहस्य प्रस्थापित होतें, आणि त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, मिथ्या पंचभौतिक

वस्त्वांतर्गत जडदेहादिकांवर अज्ञानानें आत्म्याचा आरोप केल्यामुळें **अहंम-ममतामूलक** अखिल द्वैत सृष्टि केवळ मनुष्याच्या कल्पनेनें उत्पन्न झाली आहे. ह्यास्तव जिज्ञासू मुमुक्षूनें प्रथमतः अज्ञाननिर्मित ममत्वाचा त्याग केल्याशिवाय त्याला अद्वैतात्म्याचें ज्ञान होणें शक्य नाहीं. **निर्ममतेचें** इतकें विवरण पुरें आहे.

**सूत्र ४७** **विविक्तस्थानं सेवते, यो लोकबंधमुन्मूलयति ।**
**निस्त्रैगुण्यो भवति, यो योगक्षेमं त्यजति ॥**

**आर्या.** एकांतवास सेवुनि, बधिरचि व्हावें जनापवादासी ।
इहपर लौकिक चिंता, त्यजुनी **सांईपदीं** शरण जा ॥

---

**विवरण**:—जीवन्मुक्तिलाभार्थ अवश्य असलेल्या साधनांपैकीं मागील सूत्रांत तीन सांगून आणखीं चार ह्या सूत्रांत सांगितलीं आहेत, व हीं चारीं देखील भगवद्गीतोक्तच आहेत. हीं साधनें अशीं "**विविक्त देशसेवित्वं**" (भ. गी. १३-१०, १८-५२) ह्या उक्तींतील **एकांतवास; "अमानित्वं"** आणि "**आत्मविनिग्रहः**" (भ. गी. १३–७) ह्यांत अंतर्भूत झालेली **लोकप्रवादाविषयींची उदासीनता; "निस्त्रैगुण्य"** (भ. गी. २-४५ व १४-२२ ते २६) म्हणजे **निर्गुण ब्रह्मैक्यता;** आणि "**नियोगक्षेम**" (भ. गी. २-४५,९-२२) म्हणजे **सकलवासनात्याग** ह्या चार साधनांपैकीं **एकांतवासाचा** विचार पंचेचाळिसाव्या सूत्रांतील दु:संगत्यागाच्या विवरणांत ओघानेंच झाला आहे. **लोकप्रवादाची** किंमत मुख्यतः काय आहे, तें प्रथम सूत्राच्या विवरणांत दिलेल्या श्रीरामचंद्रोक्तीवरून सहज कळून येण्यासारखें असून त्याविषयीं अन्यत्रही विचार केला आहे. **निस्त्रैगुण्याचा** विचार केला तर फक्त माया मात्र गुणमयी असून ( भ. गी.७-१४ ) तिच्या गुणांचा त्याग केल्याशिवाय निर्गुण परमात्म्याची प्राप्ति होणें शक्य नाहीं ( भ. गी. १४-२६ ) असें सहज लक्षांत येईल. गुणातीतांचीं जीं लक्षणें भगवद्गीतेंत सांगितलीं

आहेत ( भ. गी. १४--२२ ते २७ ) तीं साधकांचीं गुणातीत होण्याचीं साधनें आहेत, असें पक्कें उमजून साधकांनीं **सर्वारंभपरित्यागी** व्हावें, म्हणजे अर्थात् सर्वकर्मसंन्यास करावा हेंच उचित आहे. त्याजप्रमाणें साधक जर **योगक्षेमचिंतारहित** न झाला, तर भगवान् आपल्या ऐकांतिक भक्ताच्या योगक्षेमाची चिंता स्वतः करीत असतो ( भ. गी. ९-२२ ), असें जें भगवद्वचन आहे, त्यावर श्रद्धा नाहीं असें होऊन तो साधक सद्भक्तिविहीन ठरेल ! ( भ. गी. १७-२८ ) मग भगवद्प्रसाद कसा व्हावा ? इतर जीवाप्रमाणें मनुष्यप्राण्याच्याही पोटापाण्याची जी तजवीज भगवंतानें सृष्टींत आयती करून ठेविली आहे, तेवढी अगदीं पुरे आहे, हा आमचा अनुभव आहे; आणि सृष्टिनियमाविरुद्ध आचरण करण्यामुळेंच आमचें मल-मूत्रोत्सर्ग आम्हांला दुःसह होऊन राग-जनकही होतात. एक चूल जर नाहींशी केली, तर आमचे प्रायः सर्वच शारीरिक आणि मानसिक विकार संपुष्टांत येतील. जो शारीरिक विकार बंद होण्यास निदान दोन वर्षें तरी अवश्य लागतील, असें आम्हांला तीस वर्षांपूर्वी बड्या बड्या विद्वान डॉक्टर मित्रांनीं खात्रीपूर्वक सांगितलें होतें, तो मूत्रविकार आम्हीं चूल बंद करून दोन महिन्यांतच घालविला; आणि त्यामुळें आमची मलमूत्र शुद्धीही कल्पनातीत झाली होती. अति कष्टसाध्य ठरलेल्या रोगांवर असे स्वतःचे उपाय करण्याचे प्रसंग आम्हांला बरेच आले, आणि त्या प्रसंगीं ईश्वरकृपेनें आम्हाला यश प्राप्तीही मनाजोगी झाली. सारांश, आम्हीं आपल्या योगक्षेमाची फाजील चिंता करतों म्हणूनच ईश्वर आम्हांला रोगरूपी प्रायश्चित्तें भोगावयास लावितो. हत्तीसारखा प्रचंड शक्तीचा प्राणी, तसेंच वानर, हरिणें इत्यादि अति चपळ जनावरें ह्या सर्वांचा उदर-निर्वाह चुलीवांचून होतो; मग ज्यामुळें ही चूल आमच्याच पाठीस लागावी, असें आम्हीं देवाच्या घरीं पाप तरी काय केलें आहे ? वस्त्र प्रावरणालाही हाच न्याय लागू आहे, परंतु त्याचा विकार करून ग्रंथ वाढविण्यांत अर्थ नाहीं.

**सूत्र ४८** **यः कर्मफलं त्यजति, कर्माणि संन्यसति,**
**ततो निर्द्वंद्वो भवति ॥**

**आर्या** कर्मफलार्पणईशा, कार्यें प्रारब्धप्राप्त न च दुसरीं ।
तदितर नाचरणींयचि, द्वंद्वातीतत्व **सांइला** व्हावें ॥

**विवरणः**—आतां येथें प्रथमतः इतकें सांगणें अवश्य आहे कीं, ह्या चौऱ्यायशीं सूत्रांत प्रसंगानुसार अधिकारभेदानें अनेक विषय भिन्न प्रकारें अनेकदां आले असल्याकारणानें विवरणही तदनुसार असणें इष्ट आहे; ह्यास्तव बाह्यतः भासणारा पुनरुक्ति-दोष अपरिहार्य आहे. शिवाय शास्त्र-तात्पर्यनिर्णयाचीं मीमांसकांचीं जीं उपक्रमादि उपसंहारान्त सप्तलिंगें आहेत, त्यांत **अभ्यास** म्हणजे **पुनरुक्ति**, हें एक लिंग इष्ट मानिलें असल्यामुळें तिला शास्त्रदृष्ट्या दोष म्हणतांच येत नाहीं. अशा पुनरुक्तीनें विषय ज्ञान मनांत ठसण्यास फार साहाय्य होतें, हा तिचा विशेष गुण आहे, म्हणून ती मुळींच दोषार्ह नाहीं. आणि त्याचप्रमाणें तींच तींच आधारवचनें पुनःपुनः देणें, हें निदान भूमितिशास्त्रदृष्टीनें तरी दोषमूलक खास नाहीं.

सात तें चौदा ह्या आठ सूत्रांत **निष्कामता** आणि तज्जन्य **सर्व-कर्मसंन्यास** हीं **सिद्धांचीं** सहज ( स्वभावज ) लक्षणें असतात, असें सांगून प्रस्तुत सूत्रांत तीं दोन्हीं साधकांचीं अवश्य साधनें आहेत, असें म्हटलें आहे; आणि त्यांच्यामध्यें तदुद्भूत निर्द्वंद्वतेची भर घातली आहे. वस्तुतः ह्या निर्द्वंद्वतेचा शेचाळिसाव्या सूत्रांतील निर्ममत्वामध्यें कसा अंतर्भाव होतो, तें त्या सूत्राच्या विवरणांत सांगितलेंच आहे. म्हणजे ह्या सूत्रांत नवीन विषय कांहींच नाहीं असें झालें. तथापि ह्या तीन साधनांचा येथेंही थोडासा अधिक विचार करूं.

कार्यकारणन्यायानें प्रत्येक स्वकृत **कार्याचें** ( कर्माचें ) कांहीं तरी **कारण** असलेंच पाहिजे, असा सिद्धान्त न्यायतःच प्रस्थापित होतो. आता प्रत्येक जन्मांत मनुष्याकडून जें जें कांहीं कर्म अपरिहार्यत्वें घडतें त्याला

**प्रारब्ध** ( अदृष्ट पूर्वकर्म ) हें कारणीभूत असतें; आणि जें प्रारब्धेतर नूतन कर्म अपरिहार्य नसतांही बुद्धिपुरःसर केलें जातें त्याला **क्रियमाण** अशी संज्ञा असून तें ज्या हेतूनें केलें जातें, तो हेतूच त्या **क्रियमाणाचें कारण** होय. अर्थात् कोणतेंही क्रियमाण कर्म निष्काम असणें शक्य नाहीं. मनाची आधिभौतिक कर्मप्रवृत्ति **लोभमूलक** असून तिच्यायोगेंच सर्व क्रियमाण घडून येतें, हा सारा रजोगुणाचा प्रभाव आहे ( भ. गी. १४-१२ ) आणि **लोभ** हा अदैवी म्हणजे आसुरी असून नरकप्रापक आहे(भ. गी. १६-२१), ह्यास्तव लोभमूलक कर्मप्रवृत्तीमुळें बुद्धिपूर्वक केलेलें अखिल क्रियमाण-कर्म त्याच्या नरकप्रापकत्वास्तव सर्वथा त्याज्यच आहे, असा भगवद्गीतान्वयें जो सिद्धान्त ठरतो, तो लक्षांत आणला म्हणजे प्रस्तुत सूत्रांत "**कर्माणि संन्यसति** " असें म्हणून जो क्रियमाण-कर्माचा म्हणजे प्रारब्धेतर अखिल कर्मांचा संन्यास साधकाला विहित मानला आहे—त्याच्या सद्हेतूचा बोध होईल.तात्पर्य असें आहे कीं, अति दुर्लभ असलेल्या साधकांना ( भ. गी. ७-३ ) प्रत्येक अप्रारब्ध, नूतन, अस्वभावज असलेलें आधिभौतिक कर्म सर्वथा त्याज्य असल्यामुळें त्यांनीं आत्मप्राप्त्यर्थ **सर्वकर्मसंन्यास** अवश्य केला पाहिजे. आणि ईश्वरी नियमान्वयें देहास अपरिहार्यत्वें प्राप्त होणाऱ्या प्रारब्ध ( सहज म्हणजे स्वभावज ) कर्मफलांशीं स्वतःचा ( आत्म्याचा ) कांहीं एक संबंध नाहीं, अशा बुद्धीनें होणाऱ्या **प्रारब्ध कर्मफलत्यागपूर्वक सर्वकर्मसंन्यास** झाला, म्हणजे प्रस्तुत सूत्रोक्त साधनत्रयापैकीं जी निर्द्वंद्वता ( अद्वैतसिद्धि) शिल्लक राहाते, तिची प्राप्ति करून घेण्याचें स्वकार्य फार सुलभ रीतीनें साध्य होतें.

आतां प्रवृत्ति-प्रोत्साहकांच्या प्रमाणांचा विचार करूं. त्यांचें असें म्हणणें असतें कीं, ईश्वरानें ह्या जगांत आम्हांसाठीं अनंत सुख-साधनें निर्माण केलीं असून तीं साध्य करून घेण्यास समर्थ असलेली बुद्धीही आम्हाला दिली असता आम्हीं त्या सुखांना व्यर्थ कां मुकावें ? निरीश्वरसांख्य, मीमांसक, चार्वाक इत्यादिकांच्या सांप्रतच्या अनुयायांचाही हाच प्रश्न असतो. अशा रजप्रभाव

प्रकृतीच्या असुरांचा ह्या मायामय जगांत सदोदित फार भरणा असतो, म्हणू-नच येथें भगवदेकनिष्ठ पुरुष क्वचित्च दृष्टीस पडतात ( भ. गी. ७--३, १४) असें भगवंतांनीं म्हटलें आहे; आणि त्यांच्या रजप्रधान लोभमूलक (भ. गी. १४--१२ ) व नरकप्रापक ( भ. गी. १६--२१ ) आसुरी प्रवृत्तीनें जगताचा क्षय (भ. गी. १६--७ ते २०) होऊं नये, एतदर्थ त्यांचें प्राबल्य फार माजलें म्हणजे त्यांच्या नाशार्थ आणि सत्त्वप्रधान प्रकृतीच्या साधु पुरुषांच्या संरक्ष-णार्थ भगवान् स्वत: अवतार घेऊन ( भ. गी. ४--७ ते १० ) ह्या जगांतील घाण तात्पुरती काढून टाकीत असतात. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, दैवाधीन असलेल्या मनुष्यांनीं काय वाटेल तें जरी केलें, तरी त्यांना ह्या विषमज्वरा-पासून जगाची मुक्तता करितां येणें शक्य नाहीं. इच्छा असल्यास आत्मो-द्धार करण्याच्या कामीं मात्र जीव परतंत्र नाहीं; परंतु ती इच्छा उत्पन्न होण्यासही ह्या अज्ञानजन्य मोहक मायेच्या मिथ्या, जड, निरा-नंद स्वरूपाचें पक्कें ज्ञान होऊन तिचा वीट यावा लागतो. असा वीट येणें ह्यालाच वैराग्य म्हणतात; आणि तें प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत त्याची खरी किंमत कळणारही नाहीं हें जग जीवनिर्मित नाहीं, आणि तें जिवाच्या आधीनही नाहीं. तें ईशनिर्मित असून ईशाधीनच आहे. हें तत्त्व नुमजून असुर जन " **ईश्वरोऽहं** " ( भ. गी. १६-१४ ) ह्या भावनेनें जगाची सुधारणा करण्याच्या नादीं लागून आत्महितास मात्र मुकतात. आत्महितसाध-नांतच जगाचें बहुत हित आहे, हें त्यांना कळत नाहीं; आणि त्यामुळें त्यांच्या-योगें जगाचें हित होण्याऐवजीं अहितच फार होतें. ईशनिर्मित नुसत्या स्वदेहा-वर सुद्धां ज्याची काडीभर देखील सत्ता नाहीं, त्यानें "**धाता यथापूर्वम-कल्पयत** " अशा ईशकल्पनानिर्मित जगाचें ओझें आपल्या शिरावर घेतलें, तर त्याला आत्मनाशाशिवाय अन्य फल काय मिळणार ? कोरड्या बडबडीनें " **क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे** " ह्या समर्थोक्तीला बाध कसा येणार ? आणि जेथें स्तुत्यच असा दैवहीन आहे तेथें त्याच्या अगणित स्ताव-कांना तरी दैवहीनतेशिवाय अन्य लाभ कशाचा होणार ? असो. हें असुर-महात्म्यवर्णन पुरें करून आतां त्यांच्या अधिभूतप्रधान इतिकर्तव्यतेचा

विचार करूं. सुख हेंच त्यांचें इतर जीवांप्रमाणें साध्य आहे; आणि तें अगदी बरोबर आहे. परंतु शाश्वत सुख कोणतें, आणि तें कसें प्राप्त हो हयाची त्यांना कल्पनाही नसल्याकारणानें ते सारे मिथ्या, काल्पत, क्षणिक, वैषयिक सुखाभासालाच खरें सुख मानितात; आणि त्या आभासमय सुखाच्याच प्राप्ती-साठीं सतत परिश्रम करीत राहून खऱ्या अनंत, अविनाशी सुखाला अंतरतात, हेंच त्यांचें अज्ञान होय. हें वैषयिक सुख क्षणिक आहे, ह्याबद्दल कोणालाच शंका येण्याचें कारण नाहीं; कारण कोणत्याही विषय-सुखाच्या अखंड लाभाचा कोणत्याही क्षणिक देहधारी जीवाला अनुभव आलेला कोणी पाहिला नाहीं किंवा ऐकिला नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु तसा अनुभव घेण्यास जीव असमर्थ असून तो अनुभव जीवाला अप्रियही होतो, अशी प्रत्येकाला प्रतीति येत असल्या-कारणानें कोणतेंही वैषयिक सुख स्वरूपत: आनंददायक नसून त्याची आनंददाय-कता केवळ कल्पित म्हणजे मिथ्याही आहे, असें सिद्ध होतें. स्वरूपत: आनंद-दायक असलेली वस्तु जीवाला कधींही त्याज्य वाटणार नाहीं. कारण जीव स्वत: आनंदस्वरूप असल्यानें तो सहजच आनंदप्रियही आहेच. तथापि एका काळीं आनंददायक भासणारी क्षणिक जड वस्तु अन्यकाळीं नुसती निरानंदमय न भासतां त्याज्यही वाटते, ( भ. गी. २-१४ ) ह्यावरून वरील सिद्धांतच प्रस्थापित होतो. प्रत्येक जड वस्तु स्वत:च निरानंदमय असते, तेव्हां तिच्या ठायीं आनंदजनकत्व कसें संभवेल ? "**राजाला दिवाळी काय माहीत?**" ह्या म्हणींतील तत्त्वानुसार अखंड निजानंदमय असलेल्या जीवाला निजानंदानुभव येत नाहीं, हें ठीकच आहे. परंतु अज्ञानग्रस्थ जीव ह्या निजा-नंदानुभवाभावामुळें, आणि स्वत:च्या आनंदप्रियतेमुळें, "**तुझें आहे तुज-पाशीं । परि तूं जागा चुकलासी**" ह्या उक्तीप्रमाणें निजहृदयरूपी जें निजानंद वसतिस्थान आहे, तेथील आनंदाची अन्यत्र कल्पना करून निजानंदसिंधूच्या विषयानंद बिंदूवरच आपली आनंदतृष्णा भागविण्याची अखंड खटपट करून व्यर्थ श्रम पावतो. **गोडी** हा साखरेचा स्वभावगुण आहे, ह्यास्तव गोड पदार्थ आवडत नसणारालाही ती गोडच लागते. ह्या-प्रमाणें आनंददायकता हा, जर एखादा जड वस्तूचा सहज ( स्वभावसिद्ध )

धर्म असता तर ती वस्तु प्रत्येक जीवाला प्रियतम वाटली असती. पण वस्तुस्थिति ह्याच्या अगदीं उलट आहे. एकच वस्तु कांहीं जीवांना प्रिय वाटते व कांहींना अप्रिय वाटते; इतकेंच नव्हे, तर ती एकाच जीवाला एक वेळ प्रिय वाटून अन्य वेळीं त्याज्य वाटते! ह्यावरूनही प्रत्येक वस्तूचें प्रियाप्रियत्व तिच्याठायीं नसून तें भिन्न प्रकृतीच्या जिवांच्या भिन्न इंद्रियांच्या ठायीं, केवळ कल्पित स्वरूपानें असतें, असें न्यायतःच सिद्ध होतें. सकल जड वस्तु केवळ **कल्पित** सुखदायक इंद्रियक्रियांचीं साधनें आहेत. ह्याचें आतां एक उदाहरण घेऊं. धन आणि दारा ह्यांच्या प्रीत्यर्थ सतत तळमळत असलेल्या अकिंचन तरुणाला आकस्मिक वृश्चिकदंश झाल्यावर त्याच्यापुढें इंद्राच्या अप्सरा आणि कुबेराचें भांडार जरी आणून ठेविलें, तरी तो त्या सर्वांना लाथाडून देऊन केवळ दंशपूर्वस्थितींतील सहजानंदाची मात्र निःसीम अपेक्षा करितो. पूर्वीं ज्या वस्तु प्रियतम वाटत होत्या, त्या साऱ्या सहजानंदाभावीं त्याला अगदीं तुच्छ वाटतात. त्या वस्तूंच्या अभावीं त्याचा पुष्कळ काळ सहजानंदाच्या बलानें सुखांत जात असून सहजानंदाभावीं एक एक क्षणही त्याला अति दुःखद होतो. ह्याचेंच नांव विषयानंदाचें कल्पितत्त्व. परंतु

**"मारवाडांत गेल्याशिवाय पाण्याचें सुख कळत नाहीं"**

ह्यांतील रहस्याप्रमाणें सहजानंद नष्ट झाल्याशिवाय त्याच्या अखंड उत्तमत्वाचें आणि विषयानंदाच्या कल्पितत्वाचें मनुष्यास ज्ञान होत नसल्यामुळेंच तो विषयानंदासाठीं दीन होतो. आतां दुसरें एक उदाहरण घेऊं. देहेंद्रियमनप्राण ह्या आधिभौतिक आत्मभूत वस्तूंना बाह्य विषय अनुकूल असल्यास इंद्रियद्वारा मनाला सुखाभास होतो, आणि ते प्रतिकूल असल्यास दुःखाभास होतो. सुखदुःख भोगणें, हा जड, अनित्य असलेल्या मनाचा धर्म आहे. तें मन गाढ निद्रेंत आत्मस्वरूपीं तात्पुरतें लीन होतें, तेव्हां सकल सुखदुःखाभास नाहींसा होऊन जीव सहजानंदांत निमग्न असतो. त्या समयीं असलेली स्थिति व्यक्त न होण्यास मनाची आत्मस्वरूपीं लीनता आणि आत्म्याचें अकर्तृत्व हीं दोन कारणीभूत होत असून मन जेव्हां पुनः उदित होतें, तेव्हां तें निद्रावस्थेची निजानंदमयता व्यक्त करितें. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, प्रत्येक दृश्य, नश्वर वस्तूची कल्पना इंद्रि-

यजन्य ज्ञानावलंबी मनच करीत असतें. ह्या मनाच्या कल्पना अति विचित्र असतात. त्यांच्यांत सत्यांश मुळींच नसतो. वास्तविक पाहिलें तर बाह्य विषयानुकूलतेच्या तारतम्यावर तज्जन्य सुखाभासाचेंही तारतम्य अवलंबून असलें पाहिजे. पण मनाच्या कल्पनांचें वैचित्र्य कसें आहे तें पाहा. सर्वस्वी गुणविहीन असलेल्या स्वपतीच्या समागमापासून पतिव्रतेला पूर्ण सुखाभास होत असून एखाद्या सकलगुणमंडित राजबिंडयानें तिच्याकडे नुसतें वांकडया दृष्टीनें पाहिलें तरी तिला मरणप्राय दुःख होतें, असें हीन सुखसाधनावरील प्रेम आणि उच्चतम सुखसाधनांचा द्वेष, हीं दोन्हीं अतिविचित्र मनःकल्पनामूलक नाहींत, असें कोण म्हणेल? आतां तिसरें उदाहरण घेऊं. इ. स. १९०८ किंवा १९०९ सालीं वांद्रे येथें ताबुताची मिरवणूक चालली असतांना एका पोलीस शिपायाच्या चुकीनें त्याच्या हातांतील पिस्तूल उडालें, आणि त्यांतील गोळी आमच्या नजीक उभ्या असलेल्या एका मुलाच्या दोन्ही मांडयांमधून निघून गेली. त्याला आम्हीं ताबडतोब डॉ. डिमांटी ह्यांच्या दवाखान्यांत उचलून आणिलें, आणि दोन्ही जखमांची तात्पुरती तजवीज लावून त्याला आंतल्या खोलींत निजवून ठेविलें. त्याला आपल्या जखमांची कांहींच एक कल्पना नसल्यामुळें नुसती साधी ठेंच लागल्याप्रमाणें निर्धास्त राहून थोडयाच वेळानें तो आपल्या खिशांतलें पुस्तक काढून मोठयानें वाचूं लागला, आणि दुसऱ्या दिवशीं आपली शाळा बुडेल कीं काय, एवढीच त्याला काळजी होती. हा प्रकार पाहून डॉ. डिमांटीसह आम्हां सर्वांना महदाश्चर्य वाटलें. आणि ह्यापेक्षांही अधिक आश्चर्याची गोष्ट अशी झाली कीं, त्या मुलाच्या जखमांची बातमी आम्हीं ताबडतोब त्याच्या बापाला कळविल्यावरून तो जेव्हां आमच्याकडे आला तेव्हां त्याची स्थिति अर्धवट मेल्यासारखीच आम्हाला दिसली ! मनःकल्पनेचा किती अतर्क्य खेळ आहे हा ! ! अशीं अनेक उदाहरणें आम्हीं प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. गुडघ्यापासून तोडून टाकलेल्या पायाच्या पावलाला कंड सुटून गुडघ्यापासून जितक्या अंतरावर तें पाऊल होतें, तितक्याच अंतरावर सतरंजी खाजवूं लागतांना आम्ही एकदां आपल्या एका मित्रास पाहिलें; आणि त्या विचित्र कृत्याबद्दल आम्हीं जेव्हां त्याला प्रश्न केला, तेव्हां तो थोडासा

ओशाळल्यासारखा होऊन त्यानें जेव्हां आम्हाला खरा प्रकार सांगितला, तेव्हां आम्हांला मोठाच चमत्कार वाटला. स्वप्नावस्थेंतील मिथ्याभासांत आणि ह्या जागृतावस्थेंतील मिथ्याभासांत काय अंतर आहे? ह्याप्रमाणें सूक्ष्म विचार केला असतां प्रवृत्तिप्रोत्साहकाचीं वैषयिक सुखें निव्वळ आभासात्मक असून मनःकल्पनामूलक आहेत, म्हणजे मिथ्या आहेत, असें म्हणणेंच योग्य होतें.

आतां ह्या जडात्मवाद्यांना आम्हीं असे उलट प्रश्न करितों कीं, ( १ ) भिन्न कालीं भिन्न पति आणि भिन्न पत्नी असणें, हें जर तुम्हांला मान्य आहे, तर तंटेबखेडे न होतां द्रौपदीप्रमाणें एका कालीं अनेक पति असणें, हें तुम्हीं गौण कां समजतां? ( २ ) बहुपत्नी असणें हें हिंदु लोकांत व मुसलमान लोकांत त्यांच्या धर्माप्रमाणें निंद्य मानीत नाहींत, मग त्या चालीला गौणता तुम्हीं कां द्यावी? ( ३ ) द्वितीय सूत्राच्या विवरणांत दिलेल्या प्रथम इंग्रजी उताऱ्यावरून वैवाहिक निर्बंधाचें चोरून अतिक्रमण करण्याची जी सार्वत्रिक प्रवृत्ति दृग्गोचर होते, ती जर तुम्हाला इष्ट किंवा निदान अपरिहार्य वाटत असेल, तर कित्येक हजार वर्षांपूर्वीं प्रथमतः आर्यावर्तांत श्वेतकेतूनें सुरू केलेल्या विवाह-संस्थेचा नुसता असा तमाशा चालू ठेवण्यांत काय महत्व आहे? ( ४ ) स्वस्त्रीवर बेलाशक बळजबरी करण्याचा कायदेशीर हक्क असलेले पुरुष तो जर नेहमी सर्वत्र बजावीत असूनही त्याविषयीं कोठें फारसा बोभाटा झालेला दिसत नाहीं, तर विवाहित स्त्रीच्या इच्छेस वश होणाऱ्या परपुरुषाला दोषी कां म्हणावें? ( ५ ) " मियां बिबी राजी तो क्या करेग काजी, " असा ओनीड़ा कम्यूनिटीचा व्यक्तिस्वातंत्र्याचा जो नियम होता, तो दोषार्ह कां वाटावा? ( ६ ) व्यक्तिस्वातंत्र्यावर असलेले काल्पनिक निर्बंध सारेच कां फेटाळू नयेत? ( ७ ) राजशासन ( कायदा ) चुकीचें असल्यास तें कां कोणी फेटाळीत नाहीं? ( ८ ) आणि राजाश्रयाभावास्तव निःश्रेयस्कर असलेल्या राजगुह्य राजविद्येवर दुगाण्या झाडण्यांतच काय पुरुषार्थ आहे?

**सूत्र ४९ वेदान पि संन्यसति केवलमविच्छिन्नानुरागं लभते**

**आर्या** सकलहि वेदविधानें, त्यागुनिया प्रेमपूर्ण सर्वत्रीं ।
ऐसा सिद्ध असे जो, त्याला **श्रीसांई** देत निजशांती ॥

**विवरण**:—"**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः**" (भ. गी.) १५-१५ ह्या भगवदुक्तीचा स्वाध्यायद्वारा अनुभव येऊन ज्याला क्षेत्रक्षेत्रज्ञाचें ( भ. गी. १३-२ ) पूर्ण तत्त्वज्ञान होतें, तो भक्त प्रकृति ( क्षेत्र ) म्हणजे मिथ्या माया ही त्याज्य होय, असें उमजून जीवेशैक्य प्रेमांत रंगून गेला म्हणजे सहजच सकल त्रिगुणात्मक वैदिक कर्मांचाही ( भ. गी. २-४५; १८-६६ ) त्याग करितो. अर्थात् अमृतप्राशनानें ज्याच्या क्षुधेची कायमची शांति झाली आहे, त्याला क्षुधाशांतिसाधनांचें कांहींच प्रयोजन नाहीं, असा ह्या सूत्राचा तात्पर्यार्थ आहे. असा केवळ सहजानंदांत सदा निमग्न असणारा पुरुष स्वभावतः द्वंद्वातीत असल्याकारणानें सर्व भूतांच्या ठायीं आत्मवत्प्रेम ठेवून प्राप्त जीवसेवा सहजच करीत असतो; तथापि ती कर्तव्यबुद्धिनें मात्र करीत नाहीं; कारण तो स्वात्म्याला अकर्ता आणि असंग समजत असतो.

**सूत्र ५० स तरति स तरति स लोकांस्तारयति ॥**

**आर्या.** ऐसा पुरुषोत्तम जो, तो पावन होउनी जनां तारी ।
असुनी **सांईसम** तो, जगदुद्धारार्थ संचरे जगतीं ॥

**विवरण**:—मागील चार सूत्रांत मुक्तीच्या सकल साधनांचा निर्देश केला असून ह्या सूत्रांत त्या साधनांचें फळ सांगितलें आहे. त्या एकंदर पांच सूत्रांत जो विषय आला आहे, त्याचा ~~विस्तार सूत्रें तीन~~ ते सहा आणि अडतीस ते बेचाळीस ह्यांत केलेला आहे. मागील चार सूत्रांत सांगितलेल्या साधनांनीं पुरुष मुक्त होतो असें प्रस्तुत सूत्राच्या पूर्व भागांत सांगून मुक्त पुरुष इतरांनाही मुक्त करतो, असें उत्तर भागांत म्हटलें आहे. ह्यावरून गुरुकृपेशिवाय मुक्ति लाभ होत नाहीं, हाच सिद्धान्त प्रस्थापित होतो. "शिष्यस्तेऽहं

**शाधि मां त्वां प्रपन्नम्** " ( भ. गी. २--७ ) असें म्हणून शिष्यबुद्धीनें अर्जुन शरण येण्यापूर्वी त्याला श्रीकृष्णांनीं केवळ व्यावहारिकदृष्ट्याच उपदेश केला ( भ. गी. २--२, ३ ) आणि शरणागतीनंतर अध्यात्मोपदेशास सुरवात केली. ह्याचें कारण असें आहे कीं, अध्यात्मज्ञानप्राप्तीची तीव्र इच्छा होऊन शिष्यत्वबुद्धीनें गुरुशरणागत होण्याचा पूर्वी जर एखाद्यास उपदेश झाला, तर तो निष्फल होण्याचा फार संभव असल्यामुळें, अनिष्ट होतो, ह्यास्तव शरणागतीनंतरच उपदेश करण्याचा **आद्य** संप्रदाय आहे ( भ. गी. २-४ ते ७२; ४-३४ ). ह्या **आद्य** संप्रदायाचें भगवंतांनींही परिपालन केलें, ह्यावरून त्याच्या परिपालनाचें महत्व किती आहे, तें सहज दिसून येतें. भगवान् श्रीशंकराचार्यांनींही गीताभाष्य लिहितांना भगवान् श्रीव्यासांच्या **आद्य संप्रदायाचेंच** परिपालन केलेलें आहे, असें अनुगीतेवरून स्पष्टपणें सिद्ध होत आहे; त्यांनीं नवीन संप्रदास सुरू केला नाहीं, आणि तसें करण्याचें त्यांना प्रयोजनही नव्हतें; कारण प्रस्थानत्रयीचे तेच जनक होते. उपनिषदांशीं अथवा ब्रह्मसूत्रांशीं भगवद्गीता यत्किंचित जरी विरोधी असती, तरी त्यांनीं तिला बाजूला ठेवून प्रस्थानत्रयीच्या ऐवजीं प्रस्थानद्वयच निर्माण केलें असतें इतकेंच नव्हे, परंतु त्यांना जर प्रस्थानत्रयीचीच आवश्यकता वाटली असती तर त्यांनीं स्वतःच एखादा भगवद्गीतेसारखा नूतन ग्रंथही तयार केला असता. "**श्री शंकराचार्यांसारखे महातत्त्वज्ञानी आजपर्यंत जगांत झाले नाहींत**" असें आपल्या ग्रंथांत ज्यांनीं म्हटलें आहे, त्यांना प्रस्थानत्रयीविषयींच्या आमच्या ह्या म्हणण्यांत प्रत्येक शब्द मान्य करणें न्यायतःच अवश्य आहे. "**दुष्ट लोकांनीं भरलेल्या जगांत**" राहून सत्यनिष्ठ साधकाचें इष्ट कार्य सिद्धीस जाणें शक्यच नाहीं, इतकेंसुद्धां ज्याला कळत नाहीं, त्याच्यापेक्षां अधिक मायामोहग्रस्त कोठें सांपडणार? **परंतु "दुष्ट लोकांनीं भरलेल्या जगांत" रुचेल तेंच बोलावयाचा संकल्प केल्यावर दुष्ट शिरोमणि बनणेंही इष्टच असणार!** श्रीमन्महाभारतांतील **भगवद्गीता** व **अनुगीता** आणि श्रीमद्भागवतांतील **उद्धवगीता,** ह्या तिन्ही भगवान् श्रीवेदव्यासरचित गीतांमध्यें भगवान् श्रीकृष्णांनीं आपले प्रिय

सखे व भक्त असलेल्या अर्जुनोद्धवांना जो अध्यात्मोपदेश केला तोच दिलेला आहे, ह्यास्तव त्या सर्वांची एकवाक्यता असलीच पाहिजे, हें तत्त्व गीताभक्तांनी पक्कें लक्षांत ठेविलें तरच त्यांना गीतार्थ बोध होईल.

**सूत्र ५१** **अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् ।**

**आर्या** प्रेमस्वरूप भक्ती, कैशी वर्णील ती मनुज-वाचा ॥
वाचातीतचि असतें, अंतरिचें प्रेम तें जसा **सांइ** ॥

**विवरणः**—येथून पांच सूत्रांनीं भक्तांचें तन्मयत्व वर्णन केलें आहे, "**बाळंतिणीच्या वेदना बाळंतिणीला माहीत**" ह्या म्हणीप्रमाणें अद्वैतज्ञानजन्य आत्मप्रेम केवळ अनुभवगम्य असतें. तें बोलून दाखविता येत नाहीं. कारण त्याची अनुभवाशिवाय नुसती कल्पनाही होत नाहीं ( भ. गी. ३–४२ ) शब्दातीत असून अननुभवी लोकांना कल्पनातीत असलेल्या अनेक गोष्टी व्यवहारांतही नेहमीं दृष्टीस पडतात. प्रिन्सिपॉल सेल्बी साहेबांनीं कै. वा. अण्णासाहेब किर्लोस्करांचें नाटक पाहिल्यावर सुप्रसिद्ध गवयी कै. वा. बाळकोबा नाटेकरांच्या अति मधुर गायनास म्हशीच्या रेंकण्याची उपमा दिली ! आमचे मित्र कै. वा. बाळासाहेब नंदे ह्यांना जन्मापासून एकाच डोळ्यानें दिसत असल्यामुळें त्यांनीं पोक्त वयांत आम्हाला एकदां "तुम्हांला दोन्ही डोळ्यांनीं दिसतें कां ?" असा प्रश्न केला, तेव्हां त्या प्रश्नाचें मूळ कारण आम्हांला समजून मोठा चमत्कार वाटला. प्रेमादि भावना इंद्रियातीत असतात; मग इंद्रियजन्य ज्ञानावरच अवलंबून असलेल्या मनाला अनुभवाभावीं त्यांची कल्पना कशी होईल ? पुरुषत्व नसलेल्या गृहस्थाला तज्जन्य सुखाची कल्पनाही नसल्याचें आम्हीं एक उदाहरण प्रत्यक्ष पाहिलें आहे. तेव्हां कोट्यावधि मनुष्यांमध्यें क्वचित् एखाद्यालाच ज्या बुद्धिग्राह्य व अतींद्रिय असलेल्या आत्यंतिक अखंड ब्रह्मात्मैक्यानंदाचा ( भ. गी. ६–२१; ७–३ ) अनुभव येतो, त्याची योग्यता आणि तत्प्राप्ति साधनभूत संन्यासाची थोरवी ह्या गोष्टी आपल्या दुस्तर भवाब्धींत गटांगळ्या खाण्यांतच धन्यता मानणाऱ्या

हीन जिवांना समजाव्या कशा ? तथापि कोल्ह्यानें द्राक्षें आंबट म्हटलीं, तरी तीं आंबट होत नाहींत, आणि त्याच्या निंदेमुळें मालक आपला द्राक्षांचा वेल उपटूनही टाकीत नाहीं.

**भगवद्गीतेचे विचारी लोकांना अनेक भिन्नार्थ सुचतात, असें म्हणून गीतेचा गौरव करणारे अनेक महामूर्ख पंडित दृष्टीस पडतात; परंतु ह्या पंडितंमन्यांना इतकें सुद्धां कळत नाहीं कीं, गीतेचा जो भगवंताच्या मनांतील अर्थ अर्जुनाला समजला, तोच एक काय तो सुसंगत असलेला गीतार्थ सत्य असून बाकीचे सारे कुतर्कमूलक मिथ्यार्थ होत !**

**सूत्र ५२. मूकास्वादनवत् ॥**

**आर्या** मूकातें सुफलांचा, आस्वाद जसा कदापि वदवेना ।
तैसें स्तब्धां होतें, **सांई** मौनचि धरी असिद्धजनीं ॥

---

**विवरण**:--सहाव्या सूत्रांत ज्ञानी भक्त **स्तब्ध** होतो, असें जें म्हटलें आहे, तें मनांत आणून ह्या सूत्रांत मुक्या मनुष्याचें उदाहरण दिलें आहे. जमीन तयार नसतां बीं पेरलें, तर तें जसें निष्फल होतें, तद्वत् साधनविहीन पुरुषास अध्यात्मोपदेश व्यर्थ होतो; आणि साधनमार्गास प्रवृत्त झालेला पुरुषही प्रायः क्वचितच असतो ( भ. गी. ७-३ ), मग मुक्तांनीं कृपा करण्यास योग्य असा सिद्ध पुरुष कोठून मिळणार ? ह्यास्तव मुक्त पुरुष अध्यात्माविषयीं प्रायः सहजच **स्तब्ध** असतात. इतकेंच नव्हे, परंतु अनधिकारी मनुष्यांकडून आपल्याला व्यर्थ उपद्रव होऊं नये म्हणून ते कधीं कधीं " **बालोन्मत्त पिशाचवत्** " स्थितींतही असतात; कारण **अमानित्व** हें त्यांचें आद्यलक्षण असल्यामुळें ( भ. गी. १३-७ ) आत्मप्रशंसेचा सहजच त्यांना मनापासून वीट असतो.तथापि अनन्य-भावानें साधनसंपन्न पुरुष म्हणजे मुमुक्षु,श्रद्धापूर्वक शरण येऊन जर कसोटीस उतरला, तर ते आपला स्तब्धपणा टाकून त्याच्यावर

अनुग्रह करितात, ह्यांत मात्र शंका नाहीं. कै. वा. मार्तंडमामा पाटका (श्रीमंत आप्पासाहेब गद्रे ह्यांचे गुरु) ह्यांच्यावर एलिचपूरचे ब्रह्मीभूत श्रीशंकर भटजी ह्यांनीं अशा प्रकारें अनुग्रह केल्याची साद्यंत हकीकत आमचे मित्र कै वा. श्रीयुत पुरुषोत्तम परशुराम खरे (शेंडाणीकर), बी. ए., एल्एल्. बी., हायकोर्ट वकील, ह्यांनीं आम्हांला सांगितल्यावरूनच इ. स. १८९९ सालीं आम्हीं मुद्दाम संतदर्शनार्थ रजा घेऊन एलिचपूर येथें श्रीशंकर भटजींच्या दर्शनाचा लाभ करून घेतला. प्रथमदर्शनीं त्यांनीं वेड पांघरून पुष्कळ उडवाउडवी केली; परंतु श्रीयुत खरे ह्यांच्या सांगण्यावरून मी केवळ दर्शनाच्याच इच्छेनें आलों असून माझें कार्यही झालें आहे, असें आम्हीं म्हटलें, तेव्हां ते मन मोकळें करून आमच्याशीं बोलूं लागले. आणि मनःशांत्युपायाविषयीं दुसऱ्या दर्शनाच्या प्रसंगीं आम्हीं विचारल्यावरून तिसऱ्या दर्शनाच्या वेळीं नाममहात्म्यासंबंधीं श्री तुकारामाचा एक अभंग उगीच मधल्यामध्यें म्हणून आमच्या प्रश्नाचें बरोबर उत्तर आम्हांला दिलें.

## सूत्र ५३ प्रकाश्यते क्वापि पात्रे ॥

**आर्या** सद्भक्तियोग आहे, सुलभचि योगेतराहुनी जरि तो ।
तरिही संत महीवरि, विरळा असतात **साईच्या** सम जे ॥

**विवरण**--भक्तियोग मार्ग सर्व वर्णांना मोकळा असून जरी निःश्रेयस्कर आहे (भ. गी.५--२) तरी त्याचा अवलंब करण्याची बुद्धीच अनंत पूर्वजन्मींच्या सत्कर्मांवांचून (भ. गी. २--४१; ३--९; १७--२३ ते २७) होत नाहीं, असें पहिल्या सूत्राच्या विवरणांत उद्धृत केलेल्या अनुस्मृत्यंतर्गत श्लोकावरून सिद्ध होतें. ह्याचें प्रत्यंतर पाहाण्यास लांब जावयाला नको. ज्याला "**भक्तिप्रधान-कर्मयोग**" असें म्हटलें, त्याच्याच विवेचनांत भक्तीला गौणत्व येऊन कर्मास प्राधान्य येतें, हें पाहिलें म्हणजे भक्तियोगगामी बुद्धि दुष्प्राप्य आहे असें सहजच ठरतें. आणि ती दुष्प्राप्य असल्यामुळेंच तदनुयायी पुरुष या जगांत क्वचित असतात (भ. गी. ७--३) असें यासूत्रांत म्हटलें आहे.